# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०७/०५/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०७/०५/२०१९ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. ०४/०५/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. धृवकिशोर मन्साराम पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. पिठासीन अधिकारी |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ५. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |
| ६. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ८. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ९. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १२. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १३. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | सभापती |
| २. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ३. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |

**नगरसचिव :-**

सभापती साहेब आज सभेसाठी उपस्थित नसल्यामुळे आपल्यामधून सदस्यांची नेमणूक करायला लागेल.

**हसमुख गेहलोत :-**

आजच्या सभेसाठी धृवकिशोर पाटील ह्यांची निवड करण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मला सभापती पदी निवड केल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद. मिटींगला सुरुवात करण्यापूर्वी आज अक्षय तृतीया आहे. हिंदू धर्माचा सर्वात मोठा सण आहे. तसेच आजपासून रमजान महिना सुरु झाला आहे. दोन्ही धर्मियांसाठी आज चांगला दिवस आहे. मी सर्वांना शुभेच्छा देतो. अक्षय तृतीया हा सण हिंदू धर्मामध्ये पवित्र मानला जातो आणि ह्या सणापासून नविन शेती कामाची सुरुवात होते. मी ईश्वराकडे प्रार्थना करतो की ह्यावर्षी पाऊस चांगला पडून चांगली शेती व्हावी. ह्या भारत देशामध्ये चांगले पीक व्हावे. शेतकरी सबल व्हावे. तसेच रमजान महिन्याच्या जुबेर साहेबांना आणि मुस्लीम वर्गाला खास शुभेच्छा. ह्या पाच महिन्यामध्ये जी करणार दुवामध्ये हमे याद रखना। सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०७/०५/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रकरण क्र. ३, **पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

वर्षा भानुशाली :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा दि .04/03/2019 रोजीच्या दै. मुंबई मित्र व दै. संध्याकाळ या वृत्तपत्रात व Tender Id No. 2019_MBMC_435251_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.

वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 03 निविदाधारक मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एम.बी.ब्रदर्स व मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला होता. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी मा. आयुक्त यांच्या समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर दि.04/5/2019 रोजीच्या मा. स्थायी समिती विशेष सभेमध्ये सादर केले होते.

मा. स्थायी समिती विशेष सभा दि. 04/05/2019, ठराव क्र. 01 अन्वये सदरचे दर जास्त असल्याने ठेकेदारास पुनश्च: वाटाघाटी करणेकरीता बोलवू न दर कमी करणेबाबत पुन्हा वाटाघाटी करावयात व दर कमी न केल्यास निविदा फेटाळण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

नाले सफाईचे काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी पुर्ण करणे आवश्यक असून पुन्हा निविदा मागवून कार्यवाही पुर्ण करणेस लागणार कालावधी पाहता अत्यावश्यक बाब म्हणून मा. स्थायी समिती सभा ठरावाच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार मे.आशापुरा कंन्स्ट्रकशन कंपनी यांना दि. 04/05/2019 रोजी दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. ठेकेदारा समेवेत केलेल्या चर्चेनुसार नाले सफाई कामामधून निघणारा गाळा, माती शहराबाहेरील खाजगी जागा उपलब्ध करून टाकवा लागत आहे, तसेच नाले सफाईचे काम हे विशेष स्वरुपाचे व कालमर्यादेत पुर्ण करावे लागणार असल्याने यासाठी मनुष्यबळासाठी जादा वेतन अदा करावे लागत असल्याबाबत ठेकेदाराने सांगितले असून खालील नमुद दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | दि. 02/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| A | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2,296/- PER HOUR | Rs. 2,050/- PER HOUR |
| | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2,596/- PER HOUR | Rs. 2,300/- PER HOUR |
| | JCB MACHINE | Rs. 1,257/- PER HOUR | Rs. 1,100/- PER HOUR |
| B | DUMPER | Rs. 7,016/- PER SHIFT | Rs. 6,500/- PER SHIFT |
| | TORAS | Rs. 10,271/- PER SHIFT | Rs. 9,000/- PER SHIFT |
| | HAYDRA MACHINE | Rs. 1,306/- PER HOUR | Rs. 900/- PER HOUR |
| | CRAINE MACHINE | Rs. 5,192/- PER HOUR | Rs. 4,000/- PER HOUR |
| | JETTING MACHINE | Rs. 35,000/- PER HOUR | Rs. 25,000/- PER HOUR |
| | SEWER SUCKER MACHINE | Rs. 40,000/- PER HOUR | Rs. 30,000/- PER HOUR |
| c | MAN POWER | Rs.1,125/- PER LABOUR /PER DAY | Rs.1,075/- PER LABOUR /PER DAY |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा करणेकामी मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी दि. 04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

<u>ठराव :-</u>

**प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि .04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय ठेकेदारांनी वाटाघाटी केल्यानंतर ८ टक्के दर कमी केले आहेत. आमची प्रशासनाला सुचना आहे. दर कमी केले म्हणून कामामध्ये चोऱ्या माऱ्या करु नये. त्यांनी जे तासानुसार काम घेतले आहे. त्याच्यावर आमचे नियंत्रण असणार आहे. आम्ही बारकाईने ह्या विषयावर लक्ष ठेवू. जेव्हा हे काम पूर्ण होईल त्याचा अहवाल त्याचे देयक अदा करायच्या अगोदर कोणती मशीन किती तास कुठे वापरली त्याचा अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो आम्ही चर्चा करुन तुम्हाला सविस्तर माहिती देतो. परंतु अहवाल सादर करण्याची पध्दत नविन आहे. बिल काढण्यापूर्वी अशी काही पध्दत नसते. आम्ही समितीला माहिती देतो. आम्हाला किती तास लागले, कोणता नाला साफ केला ती आम्ही देऊ. परंतु बिल काढण्यापूर्वी तुमच्या मंजुरीने बिल निघेल अशी काही पध्दत नाही.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब त्यांनी बिलाच्या मंजूरीसाठी नाही सांगितले. त्यांनी सांगितले की तुम्ही कुठले नालेसफाई करता, कुठल्या मशिन यूज करता, मशिन कुठे लावल्या आहेत. कुठला गाळ उचलला आहे. तो गाळ कुठे टाकता त्या सर्वांचा अहवाल तुम्ही स्थायी समितीला सादर करा. असे त्यांचे म्हणणे आहे. बिलाच्या मंजुरीचा विषय नाही. तुम्ही सर्व नगरसेवकांना पत्र द्या की आजपासून मिरा भाईंदर शहरामध्ये नालेसफाईला सुरुवात झाली आहे. अशा मशीनरी ह्या नाल्यावर केल्या आहेत. मिरा भाईंदर शहरामध्ये किती नाले आहेत, किती नाले उघडे आहेत, किती बंदीस्त नाले आहेत, किती मॅन पावर लावलेली आहे. किती जे.सी.पी. लावल्या आहेत, किती पोकलन मशिन लावल्या आहेत. ह्या सर्वांची इन्फॉर्मेशन तुम्ही स्थायी समितीपूढे द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हे देऊ शकतो. सर्व सदस्यांना विनंती आहे नाले सफाईच्या ज्या सुचना असतील तर त्या वेळेस सांगा. आम्ही तेव्हाच देऊ शकतो. साफसफाई संपल्यावर काही तक्रारी असतात त्या तेव्हाच सांगा. मी सर्व सदस्यांना लेखी पत्र सुध्दा देतो. आपल्याकडे मशिन किती आहेत, जे.सी.पी. किती आहेत, मॅनपावर किती आहेत. आपल्या काही सुचना असतील त्या दरम्यानच्या काळामध्ये सांगावे ही विनंती.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, नंबर ऑफ मशिन बोल दिया नंबर ऑफ वर्किंग बोल दिया, पर आपका जो बिलींग है नंबर ऑफ अवर्स पे है तो प्रशासन की तरफ से आज तक मॉनिटरींग कैसे होती है और आगे कैसी होगी।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इंजिनिअर, डेप्यूटी इंजिनिअर एक एस.आय वो तीनो का सुपरव्हिजन के लिए ऑर्डर निकालनेवाले है। वो तीनो का सही होके बील निकलेगा।

**राजीव मेहरा :-**

नंबर ऑफ अवर्स जैसे शितल नगर, शांती पार्क, शांती नगर कही पे मशीन लगी है। वो कितने घंटे काम कर रही है। आपके बिलींग पर आ रहा है। आपके पास हम लोग कम्पलेंट करते है तो इंजिनिअर के पास फोन उठाने का टाईम नही होता है और रेनी सिजन के पहले आपका हेक्टीक वक्त रहेगा। तो नंबर ऑफ अवर्स उसने १ टक्का कम किया। १० टक्का नंबर ऑफ अवर्स में बढा दिया तो हमारा नुकसान है और काम भी नही होगा। मॉनेटरींग कौन है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मॉनेटरींग के लिए हमारे पास मुकादम है। सॅनिटरी, ज्युनिअर इंजिनिअर, डेप्यूटी इंजिनिअर है।

**राजीव मेहरा :-**

साहेब फोन करके कोई भी नही आता है। ३-३ दिन तक जवाब नही मिलता है। यह हॅक्टीक काम होनेवाला है।

**मा. सभापती :-**

राजीवजी सिस्टम ऐसी है मिरा भाईंदर शहर में १५५ नाले है। अलग अलग झोन में १० एस.आय है। उसके निचे मुकादम है। तो एस.आय. कॉन्ट्रॅक्टर को बोलेगा की यहाँ पे जे.सी.पी. चाहिए। यहाँ पे पोकलन चाहिए। यहाँ पे बोट पोकलन चाहिए। इस तरह से उनकी सिस्टम रेडी होती है। और वो जितना काम करता है उसका मुकादम साईन करके चलन बनाके देता है। हमारे एरिया में अगर नाले है तो हमारा ध्यान रहना चाहिए की जे.सी.पी. है, पोकलन है और हम उस मुकादम को बोलेंगे की मशिन कितने घंटे चली वो हिसाब से उनका होता है। आप उसपे वॉच कर सकते है।

**राजीव मेहरा :-**

हमारे पास इन्फॉमेशन रहेगी तो वॉच करेगे ना। हमारे वॉर्ड में जब आते है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इन्फॉमेशन दे देंगे।

**राजीव मेहरा :-**

लेकिन यह नही होना चाहिए की कल मशीन आनेवाली है और आप आज हमको इन्फॉमेशन दे रहे है।

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदाराला सांगा कर्मचारी लावताना बालमजूर नको.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो बरोबर आहे. मी सांगतो.

**मोहन म्हात्रे :-**

म्युन्सिपाल्टीचे जे कर्मचारी असतात तेच संध्याकाळी परत काम करतात. त्याच्यामुळे ते काम पण होत नाही असे काही करु नका.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते कर्मचारी घेणार नाहीत.

**वर्षा भानुशाली :-**

जे लांब गटर आहे ते पूर्ण क्लीन करता येत नाही. ते कुठेतरी तोडावे लागते. ते तोडण्यासाठी लागणारे साहित्य आपल्याकडे नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपल्याकडे नाही ते आपण भाड्याने घेऊन करु शकतो.

**वर्षा भानुशाली :-**

माझ्या वॉर्डमध्ये बराच प्रॉब्लेम आहे. खूप लांब गटर असते. त्यामुळे मध्ये एक ढक्कन ठेवायला लागेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते आपण बांधकामकडून करुन घेऊ.

**वर्षा भानुशाली :-**

ते लवकर होत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मी सांगतो.

**वर्षा भानुशाली :-**

ह्यासाठी वेगळी नेमणूक करुन घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. बांधकाम विभागाला सुचना देतो.

**वर्षा भानुशाली :-**

मुर्धा खाडी.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मुर्धा खाडीची मागच्या वेळी साफसफाई केली होती. आमच्यावर गुन्हा दाखल झाला होता. तो विषय सेन्सेटिव्ह झाला. परवानगी घेऊन केला तरी पण.............

**वर्षा भानुशाली :-**

साहेब ते करायचेच नाही का? नाला साफ करायचा नाही का?

**मा. सभापती :-**

सी.आर.झेड चा नविन प्लान्ट आला आहे.

**वर्षा भानुशाली :-**

नविन नाला पण केलेला आहे. तुम्ही नाल्यातून जी घाण काढता ती बरेच दिवस अशीच राहते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुकले की लगेच काढतो. २-३ दिवसात उचलून घ्यायची पध्दत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

ते उचलत नाही ते गाडीच्या टायरमध्ये येते. त्यामुळे सर्व रोड पण खराब होतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याची आम्ही काळजी घेतो.

**श्रीप्रकाश सिंग :-**

मा. सभापती साहेब पानपट्टे साहब से जानकारी चाहिए था। रेल्वे समांतर नाले के पास पुरे दिवार से पॅक किया है। आदमी लगा के कैसे साफ करेंगे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हर साल जैसे सिडी लगाके वैसा ही करना पडेगा।

**श्रीप्रकाश सिंग :-**

शिडी लगाके साफ नही हुआ तो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वही रास्ता है।

**श्रीप्रकाश सिंग :-**

रेल्वे से दिवार तोडने के लिए परमिशन लिया क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रेल्वे से परमिशन मांगा है। अभी तक नही मिला। परमिशन मिल जाएगी। तोडने नही देते है वो बोलते है हर साल जैसे करते है वैसा करो।

**श्रीप्रकाश सिंग :-**

फाटक के पास भी पॅक कर दिया। जहाँ से साईट व्हिजीट करने के लिए वो पुरा पॅक कर दिया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रेल्वे के साथ एक बार मिटींग हुई वापस कमिशनर के साथ मिटींग होनेवाली है। रिजनल ऑफिसर के साथ मिटींग हुई थी।

**मा. सभापती :-**

२३ तारीख को जैसे ही आचार संहिता खतम हो जाएगी तो महापौर केबीन में रेल्वे के ऑफिसर मा. आयुक्त को बुलाके वो इश्यू को सॉल्व्ह करेगे।

**तारा घरत :-**

काही गटार आताच तुंबली आहेत. त्याचे चेंबर लांब लांब आहेत. ते सांगतात चेंबर लांब आहेत. आम्ही काय करु. आताच ती गटार तुंबून ओतून चालली आहेत.

**मा. सभापती :-**

बांधकाम विभागाला आदेश द्या.

**वंदना पाटील :-**

मा. सभापती महोदय ज्या बिल्डींग तूटल्या आहेत. त्याचा रॅबीट तसाच पडलेला आहे. त्यामुळे आजूबाजूच्या बिल्डींगला त्रास होतो. तसेच २-२ गोणी रॅबीट पडले असेल ते ही कचरेवाले उचलत नाही. ते म्हणतात आमचे काम नाही. त्याचे काय करणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रॅबीट उचलण्यासाठी बांधकाम विभागामार्फत एक एजन्सी फिक्स केली आहे. आरोग्य विभाग रॅबीट उचलत नाही. रॅबीटसाठी वेगळी संस्था केली आहे.

**वंदना पाटील :-**

त्याचा आम्हाला नंबर द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते खांबित साहेबांना विचारा.

**वंदना पाटील :-**

तसेच आता गटारातला गाळ चार दिवस झाले उचलला नाही. पानपट्टे साहेब त्या रॅबीटचे काय करणार.

**मा. सभापती :-**

रस्त्यावरील खडी, माती, दगड उचलण्यासाठी एक एजन्सी फिक्स केली आहे. प्रत्येक प्रभाग समिती व्हाईज त्या प्रभाग समितीच्या अधिका-याला बांधकाम विभागाच्या इंजिनिअरला सांगा तो उचलून घेईल.

**श्रीप्रकाश सिंग :-**

मा. सभापती साहेब बिडींग के गटर का काम चालू है। वो पूरा गटर पॅक किया है। उसीके उपर पुरा खडी रेती डाल के पूरा गटर पॅक है।

**मा. सभापती :-**

बांधकाम विभाग के मार्फत से आप उसका काम रोक सकते हो।

**वंदना विकास पाटील :-**

नवघरला दोन मोठे नाले आहेत. पाणी भरल्यावर तीन झोपडपट्टया त्या पाण्याखाली जातात. ते जेव्हा साफ करतात तेव्हा आम्हाला बोलवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सगळ्यांना बोलवणार.

**प्रकरण क्र. ०३ :-**

**पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ०३ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा दि .04/03/2019 रोजीच्या दै. मुंबई मित्र व दै. संध्याकाळ या वृत्तपत्रात व Tender Id No. 2019_MBMC_435251_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.**

**वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 03 निविदाधारक मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एम.बी.ब्रदर्स व मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.**

**सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला होता. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यां नी मा. आयुक्त यांच्या समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर दि.04/5/2019 रोजीच्या मा. स्थायी समिती विशेष सभेमध्ये सादर केले होते.**

**मा. स्थायी समिती विशेष सभा दि. 04/05/2019, ठराव क्र. 01 अन्वये सदरचे दर जास्त असल्याने ठेकेदारास पुनश्च: वाटाघाटी करणेकरीता बोलवून दर कमी करणेबाबत पुन्हा वाटाघाटी कराव्यात व दर कमी न केल्यास निविदा फेटाळण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला आहे.**

**नाले सफाईचे काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी पुर्ण करणे आवश्यक असून पुन्हा निविदा मागवून कार्यवाही पुर्ण करणेस लागणार कालावधी पाहता अत्यावश्यक बाब म्हणून मा. स्थायी समिती सभा ठरावाच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार मे.आशापुरा कंन्स्ट्रकशन कंपनी यांना दि. 04/05/2019 रोजी दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. ठेकेदारा समेवेत केलेल्या चर्चेनुसार नाले सफाई कामामधून निघणारा गाळा, माती शहराबाहेरील खाजगी जागा उपलब्ध करून टाकवा लागत आहे, तसेच नाले सफाईचे काम हे विशेष स्वरुपाचे व कालमर्यादेत पुर्ण करावे लागणार असल्याने यासाठी मनुष्यबळासाठी जादा वेतन अदा करावे लागत असल्याबाबत ठेकेदाराने सांगितले असून खालील नमुद दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली आहे**

**निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे**

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | दि. 02/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| A | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2,296/- PER HOUR | Rs. 2,050/- PER HOUR |
| | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2,596/- PER HOUR | Rs. 2,300/- PER HOUR |
| | JCB MACHINE | Rs. 1,257/- PER HOUR | Rs. 1,100/- PER HOUR |
| B | DUMPER | Rs. 7,016/- PER SHIFT | Rs. 6,500/- PER SHIFT |
| | TORAS | Rs. 10,271/- PER SHIFT | Rs. 9,000/- PER SHIFT |
| | HAYDRA MACHINE | Rs. 1,306/- PER HOUR | Rs. 900/- PER HOUR |
| | CRAINE MACHINE | Rs. 5,192/- PER HOUR | Rs. 4,000/- PER HOUR |
| | JETTING MACHINE | Rs. 35,000/- PER HOUR | Rs. 25,000/- PER HOUR |
| | SEWER SUCKER MACHINE | Rs. 40,000/- PER HOUR | Rs. 30,000/- PER HOUR |
| c | MAN POWER | Rs.1,125/- PER LABOUR /PER DAY | Rs.1,075/- PER LABOUR /PER DAY |

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा करणेकामी मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी दि. 04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.**

**ठराव :-**

**प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४, **मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

मोहन म्हात्रे :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात सावचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे दि.04/03/2019 रोजीच्या दै. वृत्त मानस व दै. परशुराम समाचार या वृत्तपत्रात व Tender Id No. 2019_MBMC_435230_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.**

**वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 04 निविदाधारक मे. विंद्या ट्रेडर्स, मे. मनोहर ट्रेडींग कंपनी, मे. गणेश डेव्हलपर्स व मे. अक्षय इंटरप्रायजेस या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.**

**सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा (Financail Bid) उघडण्यात आला होता. मे.मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते. मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी मा. आयुक्त यांच्या समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर दि.04/05/2019 रोजीच्या मा. स्थायी समिती विशेष सभेमध्ये सादर केले होते.**

**मा. स्थायी समिती विशेष सभा दि . 04/05/2019, ठराव क्र. 01 अन्वये सदरचे दर जास्त असल्याने ठेकेदारास पुनश्च: वाटाघाटी करणेकरीता बोलवून दर कमी करणेबाबत पुन्हा वाटाघाटी कराव्यात व दर कमी न केल्यास निविदा फेटाळण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला आहे.**

**पावसाळा सुरु होणेस अल्प कालावधी असून पुन्हा निविदा मागवून कार्यवाही पुर्ण करणेस लागणार कालावधी पाहता अत्यावश्यक बाब म्हणून मा.स्थायी समिती सभा ठरावाच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार मे. मनोहर** **ट्रेडींग कंपनी यांना दि. 04/05/2019 रोजी दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते . त्यानुसार खालील नमुद दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली असून वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.**

| Sr. No. | Type of Suction Pump | दि. 02/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| 1 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL ETC. - 10 HP | **Rs. 560/-** PER HOUR | **Rs. 400/-** PER HOUR |

**मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10HP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे . मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी दि . 04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा . स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.**

**<u>ठराव :-</u>**

**प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.**

मिरादेवी यादव :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. ०४ :-

**मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. ०४ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात सावचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व . आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे दि.04/03/2019 रोजीच्या दै . वृत्त मानस व दै . परशुराम समाचार या वृत्तपत्रात व Tender Id No. 2019_MBMC_435230_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.**

**वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 04 निविदाधारक मे. विंद्या ट्रेडर्स, मे. मनोहर ट्रेडींग कंपनी, मे. गणेश डेव्हलपर्स व मे. अक्षय इंटरप्रायजेस या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.**

**सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा (Financail Bid) उघडण्यात आला होता . मे.मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते . मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी मा. आयुक्त यांच्या समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर दि.04/05/2019 रोजीच्या मा. स्थायी समिती विशेष सभेमध्ये सादर केले होते.**

**मा. स्थायी समिती विशेष सभा दि . 04/05/2019, ठराव क्र. 01 अन्वये सदरचे दर जास्त असल्याने ठेकेदारास पुनश्च: वाटाघाटी करणेकरीता बोलवून दर कमी करणेबाबत पुन्हा वाटाघाटी कराव्यात व दर कमी न केल्यास निविदा फेटाळण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला आहे.**

**पावसाळा सुरु होणेस अल्प कालावधी असून पुन्हा निविदा मागवून कार्यवाही पुर्ण करणेस लागणार कालावधी पाहता अत्यावश्यक बाब म्हणून मा.स्थायी समिती सभा ठरावाच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार मे. मनोहर**

ट्रेडींग कंपनी यांना दि . 04/05/2019 रोजी दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते . त्यानुसार खालील नमुद दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली असून वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | दि. 02/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| 1 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL ETC. - 10 HP | **Rs. 560/-** PER HOUR | **Rs. 400/-** PER HOUR |

मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10HP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे . मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी दि . 04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा . स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

<u>ठराव :-</u>

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदक :- श्रीम. मिरादेवी यादव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दूपारी . १२.३० वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका



(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका